निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ७९ वा
शनिवार -२४ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## ‘फडणवीसांमुळे मी परत आलोय’ छगन भुजबळांच्या वक्तव्याने भुवया उंचावल्या...

**नागपूर प्रतिनिधी** / राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचं मंत्रिमंडळात पुरागमन झालं आहे. मात्र मंत्री झाल्यानंतर छगन भुजबळ यांनी केलेल्या एका वक्तव्यानंतर सर्वांच्याच भुवया उंचावल्या. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे परत आलोय असं वक्तव्य भुजबळ यांनी केलं. त्यामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आलंय.




२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भरघोस यश मिळवल्यानंतर राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपदापासून दूर ठेवण्यात आलं होतं. मात्र जवळपास ६ महिन्यांनंतर भुजबळांचं मंत्रिमंडळात कमबॅक झालंय. त्यांना अन्न आणि नागरि पुरवठा खातंही देण्यात आलंय. मात्र मंत्री मंडळात पुनरागमन झाल्यानंतर छगन भुजबळ यांनी केलेल्या एका वक्तव्यानंतर सर्वांच्याच भुवया उंचावलेत. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे परत आल-ोय असं वक्तव्य भुजबळ यांनी केलं. २०२४ च्या निवडणुकीनंतरही माझ्या मंत्रिपदासाठी फडणवीस यांनी आग्रह धरला होता. मात्र तेव्हा पक्षाने निर्णय घेतला नाही हे सांगायलाही भुजबळ विसरले नाहीत.

एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मंत्रिमंडळात कमबॅक झाल्याचं मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितलं खरं तर दुसरीकडे मी राष्ट्रवादीचा मंत्री आहे. भाजपचा मंत्री नाही असंही स्पष्ट केलं आहे. पक्षाचा निर्णय अंतिम असल्याचं म्हणत अजितदादा नाराज होणार नाहीत याचीही काळजी घेतल्याचं दिसलं. मंत्रिमंडळातून पत्ता कट झाल्यानंतर दरम्यानच्या काळात छगन भुजबळ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात जवळीत वाढल्याचं पाहायला मिळालं होतं.

भुजबळांची फडणवीसांशी वाढती जवळीक :

मंत्रिमंडळातून पत्ता कट झाल्यानंतर भुजबळ प्रचंड नाराज होते. मंत्रिपद डावलल्यानंतर भुजबळांची फडणवीसांशी जवळीक वाढली. २३ डिसेंबर २०२४ भुजबळांकडून अचानक सांगर बंगल्यावर जात फडणवीसांची भेट घेतली. सांगर बंगल्यावर भुजबळ आणि फडणवीसांमध्ये ४० मिनिटं चर्चा केली. ३ जानेव-ारी २०२५ पुन्हा एकदा भुजबळ आणि फडणवीस यांची भेट झाली. एकाच गाडीतून फडणवीस आणि भुजबळांचा ५० मिनिटं प्रवास केला. या गाठीभेटींनंतर भुजबळ भाजपच्या वाटेवर असल्याचीही चर्चा केली.

छगन भुजबळ यांच्या या वक्तव्यावरून हे स्पष्ट होतंय की भुजबळांच्या मंत्रिपदाला राष्ट्रवादीच्याच नेत्यांचा विरोधात होता. त्यामुळे भुजबळांना मंत्रिपदापासून दूर ठेवण्यात आलं होतं. मात्र धनंजय मुंडेंचा राजीनामा भुजबळांच्या पथ्यावर पडला आणि मंत्रिमंडळातील त्यांच्या प्रवेशाचा मार्ग सुकर झाला.

## गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

**मुंबई** / इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्यासह यश संपादन करणाऱ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून ‘राघोजी भांगरे गुणगौरव योजना’ राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत दहावी-बारावीच्या गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा प्रकल्प कार्यालय, अपर आयुक्त आणि राज्यस्तरावर सन्मान केला जाणार आहे. या विद्यार्थ्यांना ५ हजार ते ३० हजार रुपयांपर्यंत रोख बक्षीस देण्यात येणार आहे.




राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागाकडून शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, नामांकित शाळा, सैनिकी शाळा, एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूल चालविले जातात. यातील काही शाळा राज्य शिक्षण मंडळ तर काही शाळा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहेत. या दोन्ही मंडळाकडून घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत आदिवासी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. दहावीसह बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखे-तील प्रत्येकी पाच गुणवंत मुला-मुलींना पारितोषिक दिले जाणार आहे.

गुणवत्ता यादीत विशेष प्राविण्यासह गुण मिळवणाऱ्या प्रथम पाच मुला-मुलींना राज्य, अपर आयुक्त आणि प्रकल्प कार्यालय स्तरावर गौरविण्यात येणार आहे. सीबीएसई बोर्डाचे विभागीय मंडळ नसल्याने ते वगळून राज्य शिक्षण मंडळाच्या नऊ विभागीय मंडळातील प्रत्येकी २४ गुणवंतांना दहा महिन्यांसाठी प्रतिमाह एक हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. अपर आयुक्त आणि प्रकल्प स्तरावर शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतून प्रथम येणाऱ्या तीन मुला-मुलींना सन्मानित करण्यात येणार आहे. दरम्यान, १०० टक्के निकाल लागलेल्या आश्रमशाळांचा सत्कार केला जाणार आहे.

असे मिळणार रोख पारितोषिक (रुपये) क्रमांक-राज्य-अपर आयुक्त-प्रकल्प कार्यालय

- प्रथम क्रमांक राज्य ३० हजार, अपर आयुक्त १५ हजार, प्रकल्प कार्यालय १० हजार
- द्वितीय क्रमांक राज्य २५ हजार, अपर आयुक्त १० हजार, प्रकल्प कार्यालय ७ हजार
- तृतीय क्रमांक राज्य २० हजार, अप्पर आयुक्त ७ हजार, प्रकल्प कार्यालय ५ हजार
- चतुर्थ क्रमांक राज्य १५ हजार
- पाचवा क्रमांक राज्य १० हजार

अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांना गुणवत्तेबाबत आवड निर्माण करण्यासाठी ‘राघोजी भांगरे गुणगौरव योजना’ सुरु करण्यात आली आहे. इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रकल्प कार्यालय, अपर आयुक्त आणि राज्यस्तरावर रोख पारितोषिक देऊन सत्कार केला जाणार आहे. १०० टक्के निकाल लागलेल्या आश्रमशाळेच्या मुख्यध्यापक आणि शिक्षकांचा उचित सन्मान करण्यात येणार आहे.

**-डॉ. अशोक वुईके,**
**आदिवासी विकास मंत्री**

## १०० दिवसांचा कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम

### विभागस्तरावर संचालक (माहिती) कार्यालय छत्रपती संभाजीनगरला प्रथम क्रमांक; जिल्हास्तरावर लातूर जिल्हा माहिती कार्यालयाला प्रथम क्रमांक

**मुंबई**/ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार जाहीर करण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांच्या विशेष मोहीमेंतर्गत राज्याच्या सर्व महसुली विभागस्तरीय आणि जिल्ह-ास्तरीय कार्यालयांच्या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. यात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या राज्यातील विभागस्तरावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक (माहिती) कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाने तर जिल्हास-तरावर लातूर जिल्हा माहिती कार्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात राज्याच्या सर्व महसूली विभागातील ४० विभागस्तरीय कार्यालये व सर्व जिल्ह्यातील ४२ जिल्हास्तरीय कार्यालयांच्या स्पर्धेचा निकाल आज जाहीर केला. संकेतस्थळ सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर या सर्वच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांचे अभिनंदन करुन पुढील उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

संकेतस्थळ सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर सर्वच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केलेल्या अतु-लनीय कामगिरीबद्दल सर्व कार्यालयप्रमुखांचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी देखील अभिनंदन केले आहे.

विभागीय स्तरावरील कार्यालयांमध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे छत्रपती संभाजीनगर येथील संचालक (माहिती) कार्यालयास प्रथम क्रमांक, अमरावती येथील उपसंचालक माहिती कार्यालयास द्वितीय क्रमांक, नागपूर येथील संचालक (माहिती) कार्यालयास तृतीय क्रमांक मिळाला आहे.

जिल्हा स्तरावरील कार्यालयांमध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे लातूर येथील जिल्हा माहिती कार्यालयास प्रथम क्रमांक, कोल्हापूर येथील जिल्हा माहिती कार्यालयास द्वितीय क्रमांक, सातारा आणि परभणी जिल्हा माहिती कार्यालयास तृतीय क्रमांक मिळाला आहे.

## मुंबई महानगरातील नालेसफाई ७ जूनपर्यंत पूर्ण करावी; नालेसफाईच्या कामात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई प्रतिनिधी**/ मुंबई शहर आणि उपनगरात सुरू असलेली नालेसफाईची सर्व कामे ७ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका प्रशासनाला दिले. वेळेत काम पूर्ण न करणाऱ्या, नालेसफाईच्या कामात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे सांगत नाल्यातून काढलेला गाळ ४८ तासांच्या आत उचलला जावा असेही निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नालेसफाईच्या कामाची पाहणी केली. भांडुप येथील उषानगर, उषा कॉम्प्लेक्स, नेहरूनगर नाला वडाळा, दादर येथील धारावी टी जंक्शन जवळील नालेसफाईची पाहणी त्यांनी केली. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर, माजी खासदार राहुल शेवाळे, आमदार तुकाराम काते, माजी आमदार सदा सरवणकर, महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुंबई महानगरात आतापर्यंत झालेल्या कामांची माहिती यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी दिली.



उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पाऊस वेळेआधीच सुरू झाला असला तरीही नालेसफाई वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. आतापर्यंत मोठ्या नाल्याची ८५ टक्के तर छोट्या नाल्यांची ६५ टक्केपर्यंत सफाई पूर्ण झाली असून अजूनही १५ दिवस हातात आहेत. त्यामुळे हे काम वेळेत पूर्ण होईल असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई महापालिका, रेल्वे प्रशासन यांच्या समन्वयाने नालेसफाई सुरू आहे. त्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. रेल्वेच्या कल्व्हर्ट खालील कचरा रोबोटच्या मदतीने स्वच्छ करण्यात येत आहे. महापालिकेने दरवर्षी पाणी साचणारी ठिकाणे निश्चित केली असून ४२२ ठिकाणी पंप बसवण्यात आले आहेत. तर दोन ठिकाणी होल्डिंग पौंड आणि १० ठिकाणी छोटे पंपिंग स्टेशन कार्यान्वित केले असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी विक्रोळी येथील सूर्यानगर या दरड प्रवण क्षेत्राला भेट देऊन येथे महापालिकेच्या वतीने संरक्षक जाळी बसवण्याचे निर्देश दिले. दरवर्षी याठिकाणी दुर्घटना घडत असल्याने स्थानिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे असे संबंधित अधिकाऱ्यांना उपमुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले. दादर येथील महापालिकेच्या सफाई कामगारांची वसाहत असलेल्या कासारवाडीला भेट देऊन बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, अभ्यासिका आणि येथे केलेल्या इतर कामांचाही त्यांनी आढावा घेतला

## गांजा विक्री प्रकरणी एक अटकेत ६.६५ किलो गांजा सह देवगाव रंगारी पोलिसांची कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम** /कन्नड तालुक्यातील २२ मे - देवगाव रंगारी गावातील आयेशा नगर येथे गांजाची विक्री करत असलेल्या एका इसमाला छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. आरोपीच्या ताब्यातून सुमारे ५ किलो ६५० ग्रॅम गांजा, अंदाजे किंमत १ लाख ६९ हजार ५०० रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.स्थानिक गुन्हे शाखेचे पथक २२ मे रोजी देवगाव रंगारी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एका पत्र्याच्या शेडमध्ये गांजाची विक्री सुरू आहे. पोलिसांनी तात्काळ छापा टाकून शेख नदीम शेख रौफ (वय ४७, रा. आयेशा नगर, देवगाव रंगारी) याला गांजासह अटक केली. त्याच्याकडे असलेल्या पिशवीतील पदार्थाची फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मदतीने तपासणी करण्यात आली असता, तो गांजा असल्याचे निष्पन्न झाले.पोलिसांनी पंच आणि तालुका दंडाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गांजाचे प्रमाणीत वजन केले असता, एकूण वजन ५.६५ किलो आढळले. पोलिसांनी संबंधित आरोपीविरोधात देवगाव रंगारी पो-लीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग मंडम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि सतीश वाघ, सपोनि पवन इंगळे आणि त्यांच्या पथकाने केली. या कारवाईत फॉरेन्सिक तज्ज्ञ, तहसील कार्यालयाचे अधिकारी तसेच देवगाव रंगारी पोलीस ठाण्याचे अधिकारी सहभागी होते.

## मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा; मंत्री अतुल सावे यांच्याकडे दिव्यांग कल्याण विभाग



**मुंबई**/ मंत्री छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा विभाग तर मंत्री अतुल लिलावती मोरेश्वर सावे यांच्याकडे दिव्यांग कल्याण विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे. याबाबतची अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाने प्रसिद्ध केली आहे.

# सिंध प्रांतातील उद्रेकाने शरीफ सरकारची डोकेदुखी वाढली

पाकिस्तानातील शरीफ सरकारपुढील आव्हाने कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिन्दुरने पाकिस्तानची जगभर नाचक्की झाली. भारताने पाकिस्तानात घुसून पाकिस्तानला जो तडाखा दिला त्याने पाकिस्तानची जनता पाकिस्तानच्या शहाबाज शरीफ सरकारवर चिडून आहे. त्यात पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये स्वतंत्र बलुचिस्तानसाठी बलुचिस्तानी नागरिकांनी सरकारविरोधात एल्गार पुकारून सरकारला आवाहन दिले आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराविरुद्ध लढा पुकारून स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा देखील केली. सीमेवर भारतीय लष्कराशी आणि सीमेच्या आत बलुचिस्तान लीबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान अक्षरशः भिकेकंगाल झाला आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला गेल्याने पाकिस्तान जगात भिकेचा कटोरा घेऊन फिरत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला निधी दिला असला तरी त्यासाठी अनेक अटी घातल्या आहेत. पाकिस्तानात महागाई इतकी वाढली आहे की पाकिस्तानी नागरिकांना एकवेळचे जेवण मिळणे देखील मुश्किल झाले आहे. महागाईने जनता मेटाकुटीला आली आहे. त्यात भारताने सिंधू जल करार स्थगित केल्याने पाकिस्तानी नागरिकांवर पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ आली आहे. जर भारताने हा जल करार पूर्ववत केला नाही तर भविष्यात पाकिस्तानात मोठी पाणीबाणी निर्माण होऊ शकते यावर तोडगा म्हणून पाकिस्तानच्या शरीफ सरकारने ग्रीन पाकिस्तान इनिशीएटीव्ह हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. सुमारे साडेतीन हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प चीनच्या मदतीने पकिस्तान साकारनार आहे. या प्रकल्पास पाकिस्तानची दुसरी हरित क्रांती संबोधली जातेय. या प्रकल्पाअंतर्गत पाकिस्तानातील चेलिस्तान वाळवंटातील सुमारे ४८ लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यासाठी शेकडो किलोमिटरची सहा कालवे काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाकडे पाकिस्तान सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून पाहण्यात येत आहे मात्र हाच प्रकल्प आता पाकिस्तानसाठी डोकेदुखी बनला आहे कारण या प्रकल्पाने सिंध प्रांतात येणारे पाणी पंजाब प्रांतात वळवले जाईल असे सिंध प्रांतातील नागरिकांना वाटते. आपल्या हक्काचे पाणी पंजाब प्रांताला मिळणार असल्याने सिंध प्रांतातील नागरिक प्रचंड अस्वस्थ आहेत या अस्वस्थतेतूनच तेथील नागरिक रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकारविरुद्ध आंदोलन करत आहेत. भारत आणि बलुचिस्तान आर्मी पुढे हतबल झालेल्या शरीफ सरकारपुढे ही नवी डोकेदुखी उभी ठाकली आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतातील लोक आता सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहेत. या आंदोलनाला हिंसक वळण देखील लागले आहे. संतप्त आंदोलकांनी सिंध प्रांतातील गृहमंत्र्यांच्या घराला आग लावली. यावेळी झालेल्या गोळीबारात तीन नागरिकांचा मृत्यू झाला. हे आंदोलन वाढतच चालले आहे. पाकिस्तान लष्कर आणि सरकारमध्ये पंजाबचे वर्चस्व असून त्यांचे सिंधच्या विकासाकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष होत असल्याची तेथील नागरिकांची तक्रार आहे. पाकिस्तान सरकार सिंध प्रांतावर कायम अन्याय करीत असल्याची भावना तेथील नागरिकांची झाली आहे. या अन्यायाविरोधात सिंध प्रांतातील नागरिक आवाज उठवत आहेत. इतकेच नाही तर या आंदोलनात सिंध प्रांतातील नागरिकांनी स्वतंत्र सिंधू देशाची मागणी केली आहे. ही मागील आताच नव्हे तर मागील काही वर्षांपासून करण्यात येत आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतात हिंदू धर्मीय नागरिक मोठया प्रमाणात राहतात. या नागरिकांवर गेल्या काही वर्षांपासून अन्यायाची मालिका सुरू असून ही अन्यायाची मालिका संपावी आणि सिंध प्रांतातील हिंदू नागरिकांना त्यांचे अधिकार आणि हक्क प्राप्त व्हावेत यासाठी जगभरातून या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. मागील काही काळात पाकिस्तानातील हिंदू महिलांवर विशेषतः सिंधी हिंदू महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे. या भागातील मुलींचे, महिलांचे फसवून, पळवून, सक्तीने धर्मांतर केले जात आहे. वाढत्या अत्याचारामुळे येथील नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. वारंवार सरकारला विनंती करूनही सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने तेथील नागरिक अस्वस्थ होते त्यातच या नव्या प्रकल्पाची भर पडल्याने तेथील नागरिकांची अस्वस्थता आणखी वाढली. आपल्यावर होणारा अन्याय दूर करायचा असेल तर स्वतंत्र सिंधू देशाशिवाय पर्याय नाही अशीच भावना तेथील नागरिकांची झाली आहे त्यातूनच स्वतंत्र सिंधू देशाची मागणी करण्यात आली. मागील वर्षीच स्वतंत्र सिंधू देशाला भारत आणि अमेरिकेने पाठिंबा द्यावा अशी विनंती करण्यात आली होती. त्यावर दोन्ही देशांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भविष्यात या दोन्ही देशांना आंदोलनकर्त्यांच्या या मागणीची दखल घ्यावीच लागेल आणि जेंव्हा हे दोन्ही देश या मागणीची दखल घेतील तेंव्हा पाकिस्तानची आणखी शकले झालेली असतील.

# वस्त्रोद्योग मंत्री संजयजी सावकारे यांचा जालना दौरा

# भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद बैठक




**आत्ताच एक्सप्रेस जालना प्रतिनिधी/** महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री मा.ना.श्री. संजयजी सावकारे यांचा आज जालना जिल्हा दौरा झाला. या निमित्ताने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात सकाळी १०.०० वाजता भाजपच्या जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद बैठक घेतली. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व जयंतीनिमित्त सुरु असलेल्या उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले.

या बैठकीत पक्षाच्या संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांच्या अडचणी, स्थानिक पातळीवरील विकासकामे, तसेच जालना जिल्ह्यातील वस्त्रोद्योग क्षेत्रातील संधी आणि आव्हानांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मंत्री महोदयांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विकासाचा प्रत्येक भाग हा कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागातूनच शक्य आहे. सरकार आपल्या सोबत असून, जनतेच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

या प्रसंगी भाजप महानगर जिल्हाध्यक्षांनी बोलताना म्हणाले की, अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त विविध उपक्रम पक्षाच्या वतीने सुरु आहेत, अहिल्याबाई होळकर यांनी जनतेच्या कल्याणासाठी केलेले कार्य, न्यायनिष्ठा आणि सत्तेचा लोकहितासाठी वापर, हे आजच्या काळातही प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यशैलीचा आदर्श घेऊनच आपण कार्यकर्त्यांनी समाजात आपले योगदान द्यावे. तसेच आपल्या पक्षाचे बळ हे कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर आणि लोकांच्या विश्वासावर उभे आहे. मत मांडा व पक्ष वाढवा ही आपली भूमिका असून, प्रत्येक कार्यकर्ता मतदारांपर्यंत पक्षाच्या धोरणांची माहिती पोहोचवण्यासाठी सदैव तत्पर राहिला पाहिजे.

जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पक्षवाढ ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने गावपातळीवर पक्षाची सेवा करताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करावा. विकास आणि विश्वास हे आपल्या कार्याचे सूत्र असले पाहिजे.

यावेळी रामेश्वर भांदरगे, विजय कामड, विमलताई आगलावे, बद्रीनाथ पठाडे, अशोक आण्णा पांगारकर, देविदास कुचे, सतीश जाधव, सुनील आर्दड, सोपान पेंढारकर, चंपालाल भगत, सर्जेराव जाधव, अर्जुन गेही, धनराज काबलिये, कपिल दहेकर, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, सखुबाई पणबिसरे, स्नेहा जोशी, सुषमा खरात, शारदा काळे, सुनील खरे, संजय डोंगरे, प्रदीप पवार, रवींद्र अग्रवाल, दिपक ठाकूर, सुनील पवार आदीसह सर्व मोर्चा, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, प्रकोष्ट / सेल / आघाडी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अंडरग्राउंड गाळ्यातील दुकानदार,ग्राहकाचे आरोग्य धोक्यात

## न.प. चे दुर्लक्ष तर सोळंके कॉम्प्लेक्स समोर पाणीच पाणी

**माजलगाव प्रतिनिधी /शेख हमीद/** माजलगाव शहरातील मेन रोड वरील प्रत्येक बिल्डिंग मालकाने तळग्रहात गाळे काढुन आपले उत्पन्न वाढवले त्यास माजलगाव नगरपालिकेने परवानग्या दिल्या मात्र सदर अंडर ग्राउंड गाळ्याची स्वच्छता कोण करणार यामुळे डासाचा प्रदुर्भाव चांगल्या प्रकारे व्हा वा म्हणून अनेकांचा मुख्य रस्त्यावरच दुकान थाटण्याचा अट्टाहास असल्यामुळे मुख्य रस्त्यावरील प्रत्येक बिल्डिंग मालकाने तळघरात गाळे काढले आहेत त्यामुळे जागा मिळेल तिथे तरुण वर्ग आपला व्यवसाय थाटत चालू आहे मात्र माजलगाव शहरातील मुख्य रस्त्याची उंची वाढल्याने आणि रोड लगतच्या




नाल्या तुंबल्याने पाणी आणि दुर्गंधीयुक्त नाल्यातील पाणी मुख्य रस्त्यालगतच्या सर्व तळघरातील गळ्यात व मुख्य रस्त्यावर साचत असल्यामुळे व्यापारी आणि ग्राहकाच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्यामुळे नगरपालिकेने वेळीच पावसाळ्यापूर्वीच स्वच्छता अभियान राबवून गाळा धारकांचे आणि ग्राहकांचे आरोग्य अबाधित ठेवावे अन्यथा नगरपालिकेला मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागण्याची चिन्ह दिसत आहेत.

वाढून दूकानदार व ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्यामुळे माजलगाव नगर पालिकेने वेळीच लक्ष घालून संबंधितला नोटीस पाठवून स्वच्छता मोहीम राबवावी अशी मागणी व्यापारी व ग्राहक वर्गातून केली जात आहे

माजलगाव शहर व ग्रामीण विभाग जिल्ह्यात सधन विभाग म्हणून ओळखला जातो त्या मुळे येथील बाजार पेठेत रोज मोठी उलढाल होते त्यामुळे अनेक तरुणांनी आपला व्यवसाय

# प्रेमविवाह करणाऱ्यांनीही बोध घेणे आवश्यक.....

एकेकाळी विद्येचे माहेरघर अशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत ख्याती असलेल्या पुणे शहराच्या नावालौकिकाला, गौरवशाली परंपरेला गेल्या काही काळापासून ओहोटी लागलेली आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवछत्रपतींचे बालपण या पुणे शहरामध्ये गेले आहे. महिला शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले, समाजसुधारक जोतिबा फुले यांच्या कार्याची मुहूर्तमेढ व उभी हयात या पुणे शहरामध्ये गेली. शिवछत्रपतींनंतर संभाजी महाराज, राजाराम महाराज, राणी ताराबाई यांच्यानंतर स्वराज्याची धुरा ज्या पेशव्यांनी सांभाळली, त्या पेशव्यांनी स्वराज्याचा कारभार याच पुण्यातील शनिवार वाड्यातून चालविला आहे. प्लेगसारख्या जीवघेण्या आजाराचा सामनाही याच पुणे शहराने खंबीरपणे केला. पुणे शहराच्या सावलीतच हाकेच्या अंतरावरील देहू-आळंदीमध्ये जगतगुरू संत तुकोबाराय, ज्ञानेश्वर माऊली यांनी वारकरी सांप्रदायाची सेवा केली. अभंग, हरिपाठ रचिले, विचारांची भिंत चालविली, रेड्यामुखी वेद बोलविले. असा नावलौकिक या पुणे शहराचा आहे. पण आज कधी कोयता गँग तर कधी अपहरण, कधी गोळीबार, कधी खंडणी युद्ध, राजकीय हत्या, अपहरण, रुग्णालयीन कारभाराचे गैरव्यवहार, तर कधी कुबेरपुत्रांकडून घडलेले अपघात अशा विविध घटनांनी पुणे शहराचा नावलौकिक इतिहासजमा होत चालला असून या शहराच्या वैभवाला, सांस्कृतिक इतिहासाला काळिमा फासण्याच्या घटना मोठ्या संख्येने घडू लागल्या आहेत. आता काहीसे वातावरण निवळत चालले असताना प्रेमविवाह केलेल्या वैष्णवीच्या आत्महत्येने पुन्हा वातावरण ढवळून निघाले असून पुणे शहर पुन्हा एकवार चर्चेच्या प्रकाशझोतात आले आहे. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणामुळे राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. वैष्णवी हगवणेने सासरी होणाऱ्या छळाला कंटाळून स्वत:चे आयुष्य संपवले असे म्हटले जात आहे. पण तिची हत्या झाल्याचा दावा वैष्णवीच्या घरचे करत आहेत. हुंड्यापायी वैष्णवीचा जीव गेल्याचे स्पष्ट झाले आहे. यादरम्यान वैष्णवीचा जाऊ मयूरीने हगवणे कुटुंबाबाबत धक्कादायक माहिती दिली आहे. मुळातच वैष्णवी आणि शशांक यांचा प्रेमविवाह झाला होता. प्रेमविवाह होण्यापूर्वी काही वर्षे उभयतांचे एकमेकांवर प्रेम होते. सासरच्या छळामुळे वैष्णवीने आत्महत्या केली असल्याचा सुरुवातीच्या काळात अंदाज व्यक्त केला जात असला तरी शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा संशय आता विविध घटकांकडून व्यक्त केला जावू लागल्याने हे प्रकरण काही वेगळेच निघण्याची शक्यता आहे.

हा प्रेमविवाह होता, परंतु हगवणे परिवाराची वाढती हाव व त्यातून वैष्णवीचा वाढत चाललेले छळ आणि या प्रेमविवाहाची अखेर आत्महत्येत झाली. वैष्णवी ही कस्पटे या सधन परिवारातील मुलगी होती. हुंड्यात मिळालेला निधी व त्यातून दोन कोटी रुपयांची मागणी, अन्य वस्तूंची मागणी पाहिल्यावर हा प्रेमविवाह नसून केवळ वैष्णवीच्या माहेरी असलेला पैसा लाटण्यासाठीच शशांक हगवणे याने प्रेमाच्या नावाखाली भुलविले असल्याचे, गळाला लावले असल्याचे स्पष्ट झाले आहे. सधन घरातील वैष्णवीने जर वेळीच आई-वडिलांचे म्हणणे ऐकले असते तर तिला आज जीव गमवावा लागला नसता, असा सूर आता पुणेकरांकडून आळविला जावू लागला आहे. वैष्णवीच्या लग्नाला तिच्या घरातल्यांनी म्हणजेच कस्पटे कुटुंबाने विरोध दर्शवला होता. मात्र वैष्णवीला शशांकशीच लग्न करायचे होते. अखेर वैष्णवीच्या नातेवाइकांनी कस्पटे परिवाराची समजूत काढल्यावर वैष्णवीच्या वडिलांनी थाटामाटात विवाह लावून दिला. हुंड्यामध्ये ५१ तोळे सोने, फॉर्च्युनर गाडी, चांदीची भांडी असे कस्पटे परिवाराने देऊनही हगवणे परिवाराचे समाधान झाले नाही. विवाहानंतर मात्र हगवणे कुटुंबाची हाव काही संपली नाही, उलट ती वाढतच गेली. विवाहाच्या वेळी १ लाख २० हजारांचे घड्याळ शशांकने मागून घेतले होते. त्यानंतर आता काही दिवसांपूर्वी जमीन घ्यायची असल्याचे सांगत शशांकने कस्पटे परिवाराकडे दोन कोटींची मागणी केली होती. ते पैसे न मिळाल्याने वैष्णवीचा छळ वाढत गेला. सासरच्या मंडळींकडून वैष्णवीला बेदम मारहाण होत असे. वैष्णवी गर्भवती राहिल्यावर तिच्या चारित्र्यावरच संशय घेण्यात आला. वैष्णवीचा मृत्यू गळ्याजवळ झालेल्या फासाने झाला आहे. पण तिच्या मृतदेहावर धारदार वस्तूने वार केल्याच्या अनेक जखमा देखील आढळून आल्या असल्याचे शवविच्छेजन अहवालामध्ये म्हटले आहे. वैष्णवीला हुंड्यावरून तिच्या सासरचे लोक त्रास देत होते, तिने आत्महत्या केली नसून तिचा खून झाला आहे असा वैष्णवीच्या वडिलांनी दावा केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी शशांक हगवणे (वैष्णवीचा पती), लता हगवणे (सासू) आणि करिष्मा हगवणे (नणंद) यांना अटक केली आहे. सासरे राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे फरार आहेत. वैष्णवीच्या नवऱ्याला हुंड्यात दिलेली आलिशान फॉर्च्यूनर कार पोलिसांनी जप्त केली आहे. मुळात कस्पटे परिवाराने विवाहात इतका खर्च केल्याने, दागिने, महागडी गाडी व अन्य वस्तूंची भेट दिल्यानेच हगवणे परिवाराचा स्वार्थ वाढत गेला. कस्पटे परिवाराने साधेपणाने विवाह करत महागड्या भेटवस्तू नाकारल्या असत्या तर हगवणे परिवारानेही अपेक्षा व्यक्त केल्या नसत्या. अर्थात या सर्व जर-तरच्या आहेत. आता त्याला अर्थ नाही. पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरात वैष्णवीच्या रूपाने हुंडाबळीची घटना घडली आहे. एकीकडे कस्पटे या धनाढ्य कुटुंबाला आपली मुलगी गमवावी लागली तर प्रेमविवाहाच्या अट्टहासापायी घरच्यांचे म्हणणे न जुमानता चुकीच्या घराची निवड केल्याची किंमत वैष्णवीला आपले जीवन संपवून मोजावी लागली आहे. हगवणे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुळशी तालुकाध्यक्ष असले तरी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी हगवणे परिवाराला फटकारले आहे. संबंधितांच्या अटक करण्याचे निर्देश देऊन वैष्णवीच्या लहान मुलाला कस्पटे परिवाराच्या स्वाधीन करण्याच्या पोलिसांना सूचना दिल्या आहेत.

पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरात हुंडा देण्याघेण्याच्या घटना घडतात, त्यातून हुंडाबळीच्या घटना जन्माला येतात, हे सर्वच घृणास्पद आहे. अशा गोष्टी पुणे शहराच्या नावलौकिकाला शोभनीय नाहीत. प्रेमविवाहाची अखेर स्मशानाच्या मार्गावर गेल्याने हळहळ व्यक्त केली जात असली तरी राजकारणात वावरणाऱ्यांनी पैसाच्या लोभापायी घरातील सुनेचा अमानुष छळ केला. घराबाहेर जनसेवेचा चेहरा घेऊन वावरणारी मंडळी पैशाच्या हव्यासापायी घरातील सुनेवर अत्याचार करत होते. या घटनेतून प्रेमविवाह करणाऱ्यांनीही बोध घेणे आवश्यक आहे. या घटनांना वेळीच आवर बसणे काळाची गरज आहे. आपण सधन असलो तरी मुलीला प्रेमापायी काय द्यावे, किती द्यावे यालाही बंधने घालणे आवश्यक असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

# आंबा- मिलेट महोत्सव २०२५ चे उद्घाटन शेतकऱ्यांना उत्तम बाजार सुविधा द्या - राज्यपाल हरिभाऊ बागडे

## आडगाव येथील माजी सैनिक नारायण बाळा भोसले यांचे निधन



**आत्ताच एक्सप्रेस कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील आडगाव पि येथील माजी सैनिक तथा जिल्हा आजी -माजी सैनिक संघटनेचे माजी जिल्हा अध्यक्ष नारायण बाळा भोसले (वय ७६ यांचे गुरुवारी दुपरी दोनच्या सुमारास राहत्या घरी दुःखद निधन झाले . त्यांच्या पश्चात पत्नी , एक मूलगा , चार मूली , सूण जावई व नातवंडे असा परिवार आहे .गुरुवारी संध्याकाळी सातच्या सुमारास त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले १९७१ च्या युद्धात सहभाग होता सेवानिवृत्ती नंतर राष्ट्रीय कार्यक्रमात सैनिकी बाणाच्या पिंडाने ते हजर जबाबी म्हणून त्यांची ओळख होती . माजी सैनिक तथा महानगर पालिका शिक्षक रवीकांत भोसले यांचे वडील तर औषधी निर्माता अधिकारी दिव्या पंढरीनाथ भोसले यांचे ते आजोबा होत .

## कन्नड तालुक्यातील इसमाचा मृतदेह गल्ले बोरगावजवळ आढळला,वाहन परवान्यावरुन पटली ओळख



**आत्ताच एक्सप्रेस खुलताबाद प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील गल्ले बोरगाव ते तिसगाव रोडवर अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आल्याची घटना शुक्रवारी (दि.२३) सकाळी उघडकीस आली.या प्रकरणी खुलताबाद पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला.दुपार पर्यंत मृत इसमाची ओळख पटवण्यात खुलताबाद पोलिसांना यश आले. मृताचे नाव जयलाल ताराचंद राठोड (वय ४१,रा.हिवरखेडा, ता.कन्नड) असे असून,सदरील ओळख त्याच्या खिशातील वाहनचालक परवाना पाहून पटवण्यात आली. दरम्यान,मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार मनोहर पुंगळे पुढील तपास करत आहेत.

---

**आत्ताच एक्सप्रेस छत्रपतीसंभाजीनगर प्रतिनिधी/** सहकारी संस्था या सगळ्यांच्या हिताचा विचार करणाऱ्या असाव्या. त्यासाठी आपापसातले मतभेद बाजूला ठेवावे. आंबा महोत्सवासारखे आयोजन करुन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्तम बाजार सुविधा संचालकांनी उपलब्ध करुन द्याव्या, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी आज येथे केले.

एकदा चांगल्या कामाला सुरुवात केली त्याला लोकांचा विश्वास प्राप्त होतो. बाजार समिती मार्फत राबविल्या जाणाऱ्या शेतकरी हिताच्या सर्व उपक्रमात आपला सहयोग असेल, असे आश्वासन पालकमंत्री संजय शिरसाट यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिले.

येथील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आंबा मिलेट महोत्सव २०२५ चे उद्घाटन आज राज्यपाल हरिभाऊ बागडे, राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते आज करण्यात आले. आ. अनुराधा चव्हाण यांचीही यावेळी उपस्थिती होती. बाजार समितीच्या वतीने उभारण्यात आलेल्या पेट्रोल पंपाचे लोकार्पणही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

बाजार समितीच्या आवारात आयोजित या महोत्सवात आंबा उत्पादक शेतकरी, धान्य उत्पादक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, महिला बचत आदींनी आपले स्टॉल्स लावले होते. बाजार समितीचे सभापती डॉ. राधाकिसन पठाडे, संचालक रामुकाका शेळके, भगावन मुळे, मुरलीधर चौधरी, व्यवस्थापक नितीन पाटील, विभागीय सह. निबंधक शरद दरे, एच पी कंपनीचे अजय सिन्हा आदी उपस्थित होते. हा महोत्सव पाच दिवस सुरु राहणार आहे.



पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, बाजार समितीचे कार्य चांगले असून शेतकऱ्यांसाठी ते महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देणे. शेतमालाची विक्री सुविधा उपलब्ध करणे यातून शेतकऱ्यांचे हित साधण्याच्या या कामात आपले नेहमीच सहकार्य आणि सहयोग राहिल,असे त्यांनी उपस्थितांना आश्वस्त केले.

आ. अनुराधा चव्हाण यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. राधाकिसन पठाडे यांनी केले.

---

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने आयोजीत 'लघु उद्योजक प्रशिक्षण' कार्यक्रमास उद्योजकांचा प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** जिल्ह्यातील लघु उद्योजकांना उद्योग व्यवसायात येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आयोजीत 'लघु उद्योजक प्रशिक्षण' कार्यक्रमास उद्योजकांनी उत्तम प्रतिसाद दिला.




जिल्ह्यातील १३० लघु उद्योजकांनी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला. येथील देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थायेथे हे प्रशिक्षण पार पडले. दि. आसरा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील १३० लघु उद्योजकांनी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला. दि. आसरा फाउंडेशनचे स्नेहा नन्नावरे, प्रकाश आगाशे, उद्योजक शिवप्रसाद जाजू, डॉ. आनंद गोडसे, आशीष गर्दे यांनी मार्गदर्शन केले. विशेष कार्य अधिकारी कृष्णा कांगुले हे यावेळी उपस्थित होते.याठिकाणी अण्णासाहेब पाटील महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, महात्मा फुले महामंडळ, संत रोहिदास महामंडळ, माविम, अपंग व वित्त विकास महामंडळ इ. महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले होते. प्रास्ताविक उपायुक्त श्रीमती विद्या शितोळे यांनी केले. सूत्रसंचालन अनिल जाधव यांनी तर आभार प्रदर्शन सहायक आयुक्त. सुरेश वराडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सुरेश बहुरे, योगेश उगले, शालिक चौधर, विरेंद्र चव्हाण, गजानन खोकड, रामदास फुले, नागेश मिटकरी, प्रीतम सोनवणे, आदित्य चोपडे आदींनी परिश्रम घेतले.

---

## सुभेदारीच्या व्हीव्हीआयपी सुट चे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुभेदारी विश्रामगृहाच्या आवारात नव्याने बांधण्यात आलेल्या व्हीव्हीआयपी सुट्चे आज राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

विधानपरिषद सदस्य आ. संजय केणेकर तसेच अधीक्षक अभियंता सुंदरदास भगत, कार्यकारी अभियंता अशोक येरेकर, श्रीमती प्रिया पुजारी, माजी महापौर नंदकुमार घोडेले तसेच अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. शिरसाट यांच्या हस्ते फीत कापून व कोनशिला अनावरण करुन या कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. पालकमंत्री श्री. शिरसाट म्हणाले की, सुभेदारी या विश्रामगृहाला ऐतिहासिक वारसा आहे. येथे अनेक मान्यवर वास्तव्यास राहून गेले आहेत. या शहराचाही लौकीक आहे. या लौकीकाला साजेशी ही वास्तू तयार झाली आहे, याबद्दल पालकमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.



प्रास्ताविकात कार्यकारी अभियंता श्रीमती पुजारी यांनी माहिती दिली की, या इमारतीत बेसमेंट मजल्यावर वाहनतळ, वाहनचालकांसाठी कक्ष, इलेक्ट्रीक रुम, तळ मजल्यावर दोन व्हीव्हिआयपी सुट, स्वयंपाक व भोजन कक्ष, पुरुष महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छता गृहे, पहिल्या मजल्यावर एक व्हीव्हीआयपी कक्ष, कॉन्फरन्स हॉल, प्री फंक्शन लॉबी, सार्वजनिक स्वच्छता गृहे, दुसरा मजल्यावर एक मुख्यमंत्र्यांचा कक्ष, एक व्हीव्हीआयपी कक्ष, टेरेस रुफ गार्डन, या शिवाय प्रत्येक मजल्यावर जाण्यासाठी लिफ्ट, इलेक्ट्रिक रुम आदी सुविधा आहेत. या कामांसाठी एकूण १३ कोटी १८ लक्ष ६३ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता होती.

त्यापैकी स्थापत्य कामावर ८ कोटी ५ लक्ष ४ हजार रुपये, अंतर्गत सजावटीकरणावर १ कोटी ७१ लक्ष १ हजार रुपये तर विद्युत कामांवर ३ कोटी ८३ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

---

## सारोळा येथील ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्यांचा फुलाचे काम न झाल्यास उपोषणाचा इशारा



**आत्ताच एक्सप्रेस कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील नाचनवेल परिसरात गेल्या आठवडाभरापासून दररोज सुरू असलेल्या अवकाळी पावसाने बुधवारीही रात्रभर थैमान घातले. रात्री साडेदहा वाजता विजांच्या कडकडाटात पावसाला सुरुवात झाली.पहाटेपर्यत पाऊस पडत होता. या पावसामुळे बुधवारी

रात्री अंजना नदीला पूर आला. त्यामुळे सारोळा गावाला जोडणाऱ्या रस्त्यावरील नळकांडी पूल नदीच्या पाण्याने वाहून गेला. त्यामुळे सारोळा गावाचा सिल्लोड आणि कन्नड या दोन्ही तालुक्याशी संपर्क तुटला आहे. दरम्यान, या पावसामुळे नाचनवेल परिसरातील अनेक ठिकाणी शेत रस्त्यांवर मोठमोठी भगदाडे पडली असून नळकांडी पूल वाहून गेले आहेत.

या वेळी सरपंच सविता जगन जंगले उपसरपंच ताई धनगे ग्रा प सदस्य रामदास लेनेकर सोसायटी चे तेजराव जंगले. पो पाटील लेनेकार. सांडू गाडेकर सुरेश ढमाले. फाकिरराव बनकर. कारभारी जंगले शकुंतला कुंटे काकासाहेब जंगले. भागवत राजपूत गणेश ढमाले गजानन जंगले. साईनाथ साकले. महादू कुंटे. संतोष सूसार.ईआदी ग्रामस्थ उपस्थित होते या वेळी यांनी सर्वांनी सांगितले की पुलाचे काम मार्गी न लागल्यास आम्ही सर्व ग्रामपंचायत सदस्य सरपंच उपोषणाचा इशारा देत आहोत.

---

## ॲड. कैसरोद्दीन व सहकाऱ्यांच्या पाठपुराव्याला यश; शहराला मुख्य पाणीपुरवठा करणाऱ्या दोन्ही जलकुंभ पर्यंत जलवाहिनीचे ३०० एमएम पाईप शहरात दाखल

**आत्ताच एक्सप्रेस खुलताबाद प्रतिनिधी/** खुलताबाद शहरातील दोन्ही मुख्य जलकुंभ पर्यंत जलवाहिनीच्या कामाला अखेर गती मिळाली असून,दोन प्रमुख शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलकुंभ पर्यंत जोडणारे ३०० एमएमचे जलवाहिनीचे पाईप शहरात दाखल झाले आहेत.या कामा मुळे शहरवासीयांचा होणारा संभाव्य त्रास कमी होण्यास मदत होणार आहे. दि. २२ एप्रिल २०२५ रोजी माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी शेख समीर,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता दिलीप कोलते यांना निवेदन देत काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या होत्या. त्यामध्ये शहराची मुख्य जलवाहिनी नव्याने टाकणे, दोन्ही बाजूंनी ड्रेनेज लाईन बसवणे, नागरिकांना नियमित व व्यवस्थित नळ जोडण्या देणे,सीमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासणे व नागरिकांना त्रास न होता लवकरात लवकर काम पूर्ण करणे यांचा समावेश होता. या मागण्यांचा पाठपुरावा ॲड. कैसरोद्दीन, एजाज अहमद, शरफोद्दीन रमजानी,नवाब कमरोद्दीन, मुनीबोद्दीन, फकीर कुरेशी,हनीफ कुरेशी, सलीम जहांगीरदार,मोहम्मद नईम बक्ष, यांचे सह आदींनी सातत्याने केला.संबंधित अधिकाऱ्यांनी ही या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून गुणवत्ता राखण्याचे आश्वासन दिले.सध्या शहरात आलेले पाईप लवकरच बसवले जाणार असून, ॲड. कैसरोद्दीन यांनी हे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे अशी मागणी केली आहे. यासाठी नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, अभियंते व ठेकेदार शेख इम्रान, नितीन भोसले यांचा महत्त्वपूर्ण सहकार्य लाभत आहे.





विशेष म्हणजे म्हणजे सदरील मुख्य जलवाहिनी जवळपास ४५ वर्षे जुनी असून, याच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीसाठी तत्कालीन मंत्री अब्दुल सत्तार यांनी नगरविकास मंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून हे काम मंजूर करून घेतले होते. तसेच या कामासाठी वाढीव निधी मिळवण्यासाठी आमदार प्रशांत बंब व पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी प्रयत्न केले.

शहरवासीयांमध्ये या कामाबाबत समाधानाची भावना असून, जलवाहिनी व रस्त्याचे काम लवकर पूर्ण होऊन सार्वजनिक सुविधा अधिक सक्षम होतील, अशी अपेक्षा आहे.

ॲड. कैसरोद्दीन यांनी मुख्याधिकारी शेख समीर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता दिलीप कोलते, अभियंता सागर सावजी, तसेच नगर परिषदचे अभियंता हरी चौडेकर यांचे विशेष सहकार्य व निष्ठापूर्वक योगदान दिल्याबद्दल आभार मानले.



## संक्षिप्त

## लोकशाही दिनाचे २ जुन २०२५ रोजी आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक २ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनदेखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्वी, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

# कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम अंतर्गत राज्यस्तरावर जालना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र प्रथम क्रमांकावर

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ महाराष्ट्र शासनाने क्षेत्रीय कार्यालयातील सुधारणा कार्यक्रमाच्या १०० दिवसीय कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील सर्व विभागातील जिल्हास्तरीय क्षेत्रीय कार्यालयाच्या कामकाजाचे मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (क्युसीआय) यांचेकडून करण्यात आले होते. या मूल्यमापनामध्ये जालना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे, ही बाब जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

१०० दिवसीय कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमे अंतर्गत जालना जिल्हा कार्यालयामार्फत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. शासन निर्णयानुसार, क्षेत्रीय कार्यालयांना १०० दिवसांचा १० कलमी महत्वकांशी कृती कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. या कृती कार्यक्रमांतर्गत पुढील मुद्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले संकेतस्थळाचा विकास व अद्ययावत माहिती उपलब्ध करणे, नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी उपाययोजना, स्वच्छता व कार्यालयीन परिसराचे व्यवस्थापन, जनतेच्या तक्रारींचे वेळेवर व प्रभावी निराकरण, कार्यालयातील सुविधा व सोयींचा स्तर उंचावणे, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी प्रसार व प्रोत्साहन, क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्यक्ष भेटी व आढावा, ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी या सर्व घटकांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळेच या कार्यालयाने राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या उल्लेखनीय यशासाठी कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा वर्मा, नितीन पाटील, आयुक्त कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मुंबई, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, उप आयुक्त, आयुक्तालय मुंबई, डी.डी.पवार, उप आयुक्त विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर विद्या शितोळे, यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालनाचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या मार्गदर्शनाखाली भुजंग रिठे, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, सुरेश बहुरे, आत्माराम दळवी, डॉ. अमोल परिहार, अमोल बोरकर, प्रदिप डोळे, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, सुभाष पंडीत, उमेश कोल्हे, दिनेश उढाण, सोमेश्वर शिंदे, निर्मल बिडकर, दिपक पालवे, अमर तुपे यांचे सहकार्य लाभले आहे.



# कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम मोहीमे मध्ये जालना उप प्रादेशिक परिवहन कार्यालय राज्यामध्ये द्वितीय

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवून योजनांचा लाभ उपलब्ध करून देत शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम राज्यस्तरावर राबविण्यात आली. या मोहिमेतील दूसऱ्या टप्प्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांनी कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमे अंतर्गत राज्यात द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.




राज्य शासनामार्फत प्रशासकीय कामकाजात गतीशिलता, पारदर्शकता आणि लोकाभिमुख सेवांचे वितरण यासाठी '१०० दिवस कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम' राबविण्यात आला होता.

यामध्ये कार्यालयीन कामकाजात नवकल्पना व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विहित वेळेत सेवा वितरण, ई-ऑफिसची अंमलबजावणी,

डिजिटलायझेशन व कागद विरहित कार्यालयीन कामकाज, नागरिकांच्या तक्रारींचे जलद निराकरण, कार्यसंस्कृती सुधारणा अंतर्गत प्रशिक्षण अशा विविध बाबींच्या अनुषंगाने मूल्यमापन करण्यात आले. या बाबींमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांनी उत्तम कामगिरी केली.

या उपक्रमासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी मर्यादित वेळेत विशेष काम करुन हे यश संपादन केल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतील तरतूदीमध्ये सुधारणा

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (उचएत्रक्ष) ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. तसेच दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्राच्या सर्व विभागात प्रभावीपणे व्हावी व योजनेअंतर्गत जास्तीत-जास्त युवक-युवतींना सहभाग घेऊन जास्तीत-जास्त यशस्वी उद्योजक निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून योजनेच्या शासन निर्णयामध्ये कालानुरुप बदल करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये प्रकल्पाची कमाल मर्यादा वाढली असुन, आता उत्पादन क्षेत्रातील प्रकल्पांसाठी ११ कोटी आणि सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी रु.५० लाख पर्यंत कर्ज मिळवण्याची संधी प्राप्त झाली आहे. खेळत्या भांडवलाची मर्यादा देखील वाढली असुन यामध्ये सेवा उद्योगांसाठी आता प्रकल्प खर्चाच्या ६०% आणि उत्पादन उद्योगांसाठी ४०% पर्यंत खेळत्या भांडवलासाठी निधी उपलब्ध होणार आहे.

नवीन व्यवसायांचा समावेश कुक्कुटपालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल ढाबा (शाकाहारी/मांसाहारी), होम-स्टे. क्लाऊड किचन, जलक्रीडा, मासेमारी, प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय या योजनेतंर्गत पात्र असतील. तसेच शैक्षणिक पात्रतेत देखील शिथिलता देण्यात आली असून, आता १० लाखांवरील उत्पादन प्रकल्पांसाठी आणि ५ लाखांवरील सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी आता फक्त ८ वी पास असणे आवश्यक असणार आहे. या योजनेकरीता आता वयोमर्यादेचे बंधन राहणार नाही. आता १८ वर्ष पूर्ण झालेल्या कोणत्याही स्थानिक रहिवाशाला या योजनेचा लाभ घेता येणार आहे. तसेच निवासी/ऑनलाईन उद्योजकीय प्रशिक्षण निवड करण्याची मुभा देखील यामध्ये असणार आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता प्राप्त १ हजार ३०० प्रकरणांचे उद्दिष्ट पूर्तीसाठी ग्रामीण व शहरी तरुणांनी जास्तीत-जास्त अर्ज योजनेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावे. (.ारहर-लाशसर्.सीं.ळप) तसेच जिल्ह्यातील सर्व बँक व्यवस्थापक यांनी छाननी करून संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांना त्वरित कर्ज मंजुरी देऊन उद्दिष्ट पूर्तीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर यांनी केले आहे.

# हरियाना सरकारच्या धर्तीवर निवृत्ती वेतन मंजूर करा

## अन्यथा स्वातंत्र्य दिनापासून आंदोलन करणार - बाबासाहेब कोलते

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या वारस मुला मुलींना हरियाणा सरकारच्या धर्तीवर निवृत्तीवेतन मंजूर करून नामनिर्देशित पाल्यांना शासन सेवेत १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे समावेश करून घेण्यात यावे अन्यथा स्वातंत्र्य दिनापासून १५ ऑगस्ट महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा ईशारा स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी मयत झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना तसेच त्यांच्या मुलामुलींना हरियाणा सरकारच्या धर्तीवर निवृत्तीवेतन मंजूर करावे कारण भारत देशातील हरियाणा सरकारने राज्यातील मयत झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या वारस मुलामुलींना दि. १५ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून निवृत्तीवेतन सुरु केले आहे त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलामुलींना निवृत्तीवेतन मंजूर करावे. केंद्र व राज्यशासनाने स्वातंत्र्य सैनिक मयत झाल्यानंतर त्यांना मिळणारे निवृत्तीवेतन शासनाकडून नियमानुसार बंद होते परंतु मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची नव्या पिढीला आठवण राहावी व थोर स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास हा त्यांच्या वारस मुला मुलींना कळावात्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील एका वारसांना निवृत्तीवेतन वारसाने मंजूर करावे.

तसेच महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य गेल्या अनेक दिवसापासून शासनाने नोकर भरतीचा शासन निर्णयच रद्द केल्यामुळे गेल्या अनेक दिवसापासून वंचित आहे.

त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यावर अन्याय झाला आहे. त्यामुळे नोकरी पासून वंचित असलेल्या नामनिर्देशित पाल्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना शासन सेवेत समावून घेण्यासाठी तात्काळ शासन निर्णय निर्गमित करून नामनिर्देशित पाल्यांना १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासन सेवेत सामावून घेण्यात यावे, याबाबत स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीच्या वतीने अनेक वेळेस निवेदने केली आहे.

परंतु राज्यशासनाने याबाबत कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्यामुळे स्वातंत्र्य दिनापासून १५ ऑगस्टपासून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोलते यांनी दिला आहे.

# परतुर पंचायत समिती घरकुल विभागाचा कारभार म्हणजे थांब टकल्या भांग पाडतो सारखा चालु ?

## आम्ही दोघे भाऊ भाऊ घरकुल चे हप्ते कागदी घोडे नाचवुन शासनाचे पैसे खाऊ काय म्हणतोस भाऊ

**आत्ताच एक्सप्रेस**
**परतुर प्रतिनिधी**/ परतुर तालुक्या मध्ये ऑपरेटर घरकुल अभियंता यांच्या टक्केवारीला कंटाळून पन्नास टक्के जवळपास घरकुल कागवावर होत असल्याची चर्चा पंचायत समिती परिसरा त असुण जोपर्यत अभियंत्याला टक्केवारी मिळत नाही .

तो पर्यत घरकुल चा हप्ता लाभार्थींच्या खात्यावर जमा होत नसत्याने अनेक लाभार्थी घरकुल चे काम न करताच बिल उचलत असल्याने शासनाच्या प्रत्येकाला हक्काचे पक्के घर देण्याच्या उदिष्टाला खिळ बसत आहे परतुर तालुक्यातील गावनिहाय घरकुल ची चौकशी केल्यास पंचायत समिती मध्ये बसलेल्या अली बाबा चालीस चोर च्या टिम चे सत्य समोर येईल पण या अलीबाबा चालीस चोर च्या टिमची चौकशी करणार कोण तांगडे साहेब वेसन नसलेल्या तुमच्या घरकुल विभागाने लाभार्थीला अडचणीत आणल्याणे लाभार्थी घरकुलचे पैसे आधा तुम्हारा आधा हमारा म्हणत घरकुल कागदोपत्री पुर्ण करत असुण परतुर पंचायत समीतीचा कारभार म्हणजे थांब टकल्या भांग पाडतो सारखा झाला असुण परतुर पंचायत समीती मध्ये राजरोस पणे घरकुल लाभार्थी यांचे लचके तोडणाऱ्या घरकुल आपरेटर मुकेश आडे सह घरकुल अभियंता यांच्या मालमतची चौकशी करुण कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जनतेतून जोर धरत असुन आर्डर सिट पासुण एफ टी ओ तसेच घरकुल चा हप्ता पडे पर्यत लाभार्थी याची बिनभोबाट लुटमार करणाऱ्या घरकुल ऑपरेटर घरकुल अभियंता यांची चौकशी करुण कायदेशीर कारवाई करणार का तांगडे साहेब तुम्ही...

# छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील फ्रुट मार्केट हटवावे-ड.महेश धन्नावत

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर चारही बाजूने फळ विक्रेत्यांनी घेरला असून, या ठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. ही बाब विचारात घेता, तेथील फळ मार्केट त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ड. महेश धन्नावत यांनी महानगर पालिकेच्या आयुक्तांकडे केली आहे.

या संदर्भात ड. धन्नावत यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे सुशोभीकरण सुरू आहे. मात्र, स्मारकाच्या चारही बाजूने फळ विक्रेते बसत आहेत. हातगाड्या लावत आहेत. यामुळे स्मारक परिसरात नागरिकांची अनावश्यक गर्दी, वाहतुकीची अडचण आणि अस्वच्छता निर्माण होत आहे. स्मारकाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचत असल्याचे ड. धन्नावत यांनी नमूद केले आहे.

हा परिसर शिवाजी महाराजांचे स्मारकस्थळ असल्याने तो नेहमी स्वच्छ, शांत आणि आदरयुक्त ठेवला पाहिजे. मात्र, सध्या तेथे अनधिकृत फ्रुट मार्केटमुळे अव्यवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे हे मार्केट तातडीने इतरत्र हलवावे, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनाची प्रत माहितीस्तव जिल्हाधिकाऱ्यांनाही देण्यात आली आहे.

# मुसळधार पावसाची शक्यता; महावितरण 'हाय अलर्ट'वर

## सुरळीत वीजपुरवठ्यासाठी युद्धपातळीवर सज्ज राहा- सीएमडी श्री. लोकेश चंद्र

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने राज्यभरात पुढील तीन ते चार दिवस वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने यंत्रणेसाठी हाय अलर्ट जाहीर केला आहे. या कालावधीसह पावसाळ्यातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आपत्कालिन नियोजन करण्यात आले आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी (२३ मे) राज्यातील वीजपुरवठ्याचा आढावा घेतला. नैसर्गिक आपत्तीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा तातडीने सुरू करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, मुख्यालय व परिमंडलस्तरावर २४ ु ७ आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची लगेचच स्थापना करावी. कोणीही मुख्यालय सोडू नये, असे निर्देश श्री. लोकेश चंद्र यांनी दिले. व्हीडिओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या या बैठकीमध्ये संचालक (संचालन) श्री. सचिन तालेवार यांच्यासह राज्यातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते उपस्थित होते. यंदा मान्सूनच्या आगमनापूर्वीच राज्यात वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची दररोज हजेरी सुरू आहे. अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र सध्या स्थिर असले तरी त्याच्या प्रभावामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या परिस्थितीमध्ये सुरळीत वीजपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी ही बैठक झाली. दरम्यान, शुक्रवारपासून (२३ मे) मुख्यालय व राज्यातील आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षांचे कामकाज सुरू झाले आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र म्हणाले की, वीजपुरवठा खंडित झाल्यास तो तातडीने व वेळेत सुरू करण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. एखाद्या ठिकाणी दुरुस्ती कामाला वेळ लागणार असेल तर त्याबाबत संबंधित ग्राहकांना 'एसएमएस'द्वारे, व्हॉटस् ॲप ग्रुप्स, ट्विटर व सोशल मीडिया, प्रसिद्धी माध्यमांद्वारे ताबडतोब कळवण्यात यावे. खंडित वीजपुरवठ्याच्या कालावधीबाबत मुख्यालयाकडून पर्यवेक्षण करण्यात येत आहे. शक्य असूनही वीजपुरवठा वेळेत सुरू झाला नाही, तर त्याची गंभीर दखल घेण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही. त्यासाठी क्षेत्रीय वरिष्ठ अभियंत्यांनी मोठ्या व गंभीर बिघाडाच्या ठिकाणी स्वतः जाऊन दुरूस्ती कामांना वेग द्यावा. तसेच महावितरणच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये असे स्पष्ट निर्देश श्री. लोकेश चंद्र यांनी दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813